# फ्लिपकार्टच्या 2GUD चे सोशल कॉमर्समध्ये पदार्पण; देशभरातील ग्राहकांसाठी कंटेंट-टु-कॉमर्स दालन खुले

- **2GUD** सोशल कॉमर्सच्या माध्यमातून ब्राउज-लेड, व्हिडिओ आधारित शॉपिंग अनुभव
- व्यासपीठावर प्रभावशाली व्यक्तींचे अमर्याद व्हिडिओज, ग्राहकांसाठी कंटेंट टु कॉमर्स पर्याय

**बंगळुरू, ८ जुलै २०२० :** फ्लिपकार्ट या संपूर्णत: भारतात विकसित झालेल्या ई-कॉमर्स बाजारपेठेने आज आपल्या 2GUD या स्वतंत्र व्हॅल्यू प्लॅटफॉर्मवर सोशल कॉमर्सचा शुभारंभ करत असल्याची घोषणा केली. ग्राहक सुलभता अधिक वाढवण्याच्या उद्देशाने सुरू केलेले हे वैशिष्ट्यपूर्ण सोशल कॉमर्स फ्लिपकार्टच्या ॲपवरील सर्व ग्राहकांना उपलब्ध आहे. 2GUDच्या सोशल कॉमर्स प्लॅटफॉर्ममुळे ग्राहकांना त्यांच्या पसंतीच्या प्रभावशाली व्यक्तींकरवी ताजे फॅशन ट्रेंड्स, गॅजेट्सचे रिव्ह्यू, ब्यूटी टिप्स यांसारख्या विविध वैशिष्ट्यांचा समावेश असलेले अमर्याद व्हिडिओ पाहून खरेदीचा आनंद लुटता येईल.

विविध विषय आणि श्रेणींमधील खास निवडलेल्या प्रभावशाली व्यक्तींच्या नेटवर्कनी बनवलेले व्हिडिओज 2GUDच्या सोशल कॉमर्स प्लॅटफॉर्मवरील ग्राहकांसाठी उपलब्ध असतील. या प्रभावशाली व्यक्ती व्हर्च्युअल स्टोअरमधील संग्रहाचा भाग म्हणून त्यांच्या पसंतीची उत्पादने निवडतील, जेणेकरून ग्राहकांना विविध श्रेणींमधील त्यांच्या शैलीदार प्रवासाचा अनुभव घेता येईल. ग्राहकांना व्हिडिओत समाविष्ट असलेल्या उत्पादनांची खरेदी अन्यत्र कुठेही न जाता, जागच्या जागीच करता येणार असून त्यामुळे त्यांना विनाअडथळा, नैसर्गिक आणि कंटेंट-टु-कॉमर्स अनुभव घेता येणार आहे.

या शुभारंभाबाबत **फ्लिपकार्टच्या 2GUD चे प्रमुख चाणक्य गुप्ता** म्हणाले, "ऑनलाइनच्या प्रवाहातील पुढील २० कोटी ग्राहकांना अत्यंत सुलभतेने सोशल कॉमर्सचा अनुभव घेता यावा आणि **2GUD** बाबत त्यांच्या मनात विश्वास निर्माण व्हावा, हे आमचे उद्दिष्ट आहे. अनेकदा या ग्राहकांना विश्वास आणि शैलीचा अभाव जाणवतो. अशा परिस्थितीत तुमच्यासारखीच कोणी व्यक्ती अथवा एखाद्या प्रभावशाली व्यक्तीची शिफारस महत्त्वाची ठरत असते. प्रभावशाली व्यक्ती ऑनलाइन रिटेलचे स्वरूप बदलत असून भारतात सोशल कॉमर्स प्लॅटफॉर्म्ससाठी अधिक मोठ्या संधी खुल्या करत आहेत. देशभरात त्यांचे लक्षावधी चाहते आणि पाठिराखे असल्यामुळे ग्राहकांच्या खरेदीबाबतच्या निर्णयावर प्रभाव टाकण्याची क्षमता त्यांच्याकडे आहे. हे लक्षात घेऊन आमच्या लक्ष्यित ग्राहकांना समजून घेऊन त्यांना खरेदीबाबतचा निर्णय घेण्यास मदत करण्यास सक्षम असलेल्या काही खास प्रभावशाली व्यक्तींची आम्ही निवड केली आहे.

सोशल मीडियाच्या आगमनासह ग्राहक कशा प्रकारे कंटेंट पाहतात, यात गेल्या काही वर्षांत आमूलाग्र बदल झाला आहे. मेट्रो शहरांपलिकडील शहरांमध्ये ज्या प्रकारे प्रभावशाली व्यक्तींचा उदय झाला आहे, त्यामुळे नव्या पिढीतील कंटेंट निर्मात्यांचा रस्ता प्रशस्त झाला असून त्यांना अधिक व्यक्तीगत आवडीनिवडी व

संपर्कांचा वापर करून मेट्रो शहरांपलिकडील शहरांमधील प्रेक्षकांना सहज आपलेसे करणे शक्य होते. सोशल कॉमर्सने यापूर्वीच आपला ठसा उमटवण्यास सुरुवात केली असून आजमितीस ऑनलाइन रिटेल बाजारपेठेत १५ ते २० टक्के हिस्सा असलेल्या सोशल कॉमर्सची उलाढाल येणाऱ्या दशकभरात ७० अब्ज डॉलरपर्यंत पोहोचेल, असा अंदाज आहे. स्वस्तातील डाटा आणि भारतातील, विशेषत: द्वितीय व तृतीय पातळीवरील शहरांमधील पहिल्यांदाच इंटरनेटचा वापर करणाऱ्यांची वाढती संख्या पाहाता सोशल कॉमर्स उद्योगासाठीची संधी मोठ्या प्रमाणावर विस्तारत आहे.




सध्या ॲपपुरते मर्यादित असलेल्या या सोशल कॉमर्सचा विस्तार 2GUD लवकरच मोबाइल साइट आणि वेबसाइटवरही करणार आहे. सध्या 2GUD मूल्याधारित नवी उत्पादने व अस्तित्वातील फेरवापर करावयाची उत्पादने या विभागातील सुमारे ६००हून अधिक श्रेण्यांमध्ये सेवा देत आहे. या व्यासपीठावर देशभरातील १५ हजारांहून अधिक पिनकोड्सच्या क्षेत्रातील १० लाखांहून अधिक ग्राहक आहेत.

**About the Flipkart Group**

The Flipkart Group is one of India's leading digital commerce entities and includes group companies Flipkart, Myntra, and PhonePe. Started in 2007, Flipkart has enabled millions of

consumers, sellers, merchants and small businesses to be a part of India's e-commerce revolution. With a registered customer base of over 200 million, offering over 150 million products across 80+ categories. Our efforts to democratize e-commerce in India, drive access and affordability, delight customers, create lakhs of jobs in the ecosystem and empower generations of entrepreneurs and MSMEs has driven us to innovate on many industry firsts. Flipkart is known for pioneering services such as Cash on Delivery, No Cost EMI and easy returns – customer-centric innovations that have made online shopping more accessible and affordable for millions of Indians. Together with Myntra, which holds a prominent position in the online fashion market, and PhonePe, India's fastest growing digital payments platform, the Flipkart Group is steering the transformation of commerce in India through technology.

**For more information, please contact media@flipkart.com.**